महाराष्ट्र शासन

**शिक्षण उपसंचालक,कार्यालय,अमरावती विभाग,अमरावती**

दुरध्वनी क्रमांक- ०७२१-२५५३६०४/२५५३६०५ ई-मेल-dydamt@gmail.com

जा.क्र.शिउसं/प्राथ/क/ ३८८७ /२०२० दिनांक :- 23 SEP 2020

प्रति,

मा. प्रधान सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

विषय :-युगधर्म पब्लिक स्कुल,सजनपुरी ता.खामगाव, जि.बुलडाणा या शाळेचा सी.बी.एस.ई. नुतनीकरण करण्याकरिता ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर करणेबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.नाहप्र ४०१९/प्र.क्र.३६/१९/एसएम-३ दिनांक २० जुलै,२०२०.
२) शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.नाहप्र ४०१७/प्र.क्र.०१/२०/एसएम-३ दिनांक ०४ मार्च,२०२०.
३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.बुलडाणा यांचे पत्र क्र.बुजिप/शिप्रा/खाप्राशा/३११४/२०२०, दिनांक ११.०८.२०२०.
४) मुख्याध्यापक, युगधर्म पब्लिक स्कुल,सजनपुरी ता.खामगाव, जि.बुलडाणा यांचा दिनांक १०.०८.२०२० चा प्रस्ताव.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, युगधर्म पब्लिक स्कुल,सजनपुरी ता.खामगाव, जि.बुलडाणा ही शाळा इयत्ता १ ली ते १० वी पर्यंत सी.बी.एस.ई. सत्र २०१४-१५ शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यीत तत्वावर मान्यता देण्यात आलेली आहे.

शिक्षणाधिकारी, प्राथमिक, जि.प.बुलडाणा यांनी त्यांचे संदर्भीय पत्रानुसार सदर शाळेला सी.बी.एस.ई. शाळा सुरू करण्याकरिता ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबतचा प्रस्ताव शिफारशीसह या कार्यालयाकडे सादर केलेला असल्यामुळे सदर सी.बी.एस.ई. शाळेस ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचा प्रस्ताव सविनय सादर करण्यात येत आहे. स्विकृत व्हावा ही विनंती.

सहपत्र :-मुळ प्रस्ताव.

आपला विश्वासू

(ए.एस.पवार)
शिक्षण उपसंचालक,
अमरावती विभाग,अमरावती

प्रतिलिपी :- शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प. बुलडाणा यांना माहितीकरिता.

G:\Desktop old computer copy past\Patil\N.O.C. CBSE.docx- 9

जा.क्रं.बुजिप/शिप्रा/खाप्राशा/ 3994 /२०२०
बुलडाणा जिल्हा परिषद,बुलडाणा
शिक्षण विभाग,(प्राथमिक)
दिनांक :- ११ ऑगष्ट, २०२०.

प्रति,
मा. शिक्षण उपसंचालक,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- युगधर्म पब्लिक स्कुल, सजनपुरी ता. खामगांव जि. बुलडाणा या शाळेचा सी. बी. एस. ई. नुतनीकरण करण्याकरीता नाहरकत प्रमाणपत्र मिळणे बाबतचा प्रस्ताव सादर करणे बाबत.**

संदर्भ :- गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती खामगांव यांचे पत्र क्रं. पंसखा/समग्र/नाप्र/१०२८/२०२० दिनांक ०७/०८/२०२०.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये गट शिक्षाधिकारी, पंचायत समिती खामगांव यांनी युगधर्म पब्लिक स्कुल, सजनपुरी ता. खामगांव जि. बुलडाणा या शाळेस सी.बी.एस.ई. चे नाहरकत प्रमाणपत्र मिळणे बाबतचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे.

सबब युगधर्म पब्लिक स्कुल, सजनपुरी ता. खामगांव जि. बुलडाणा या शाळेस सी.बी.एस.ई. चे नाहरकत प्रमाणपत्र मिळणे बाबतचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी आपले कार्यालयास सादर करण्यात येत आहे.
सहपत्र :- प्रस्ताव २ प्रति

( ई.झेड.खान )
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, बुलडाणा.